**प्रेस नोट** **दिनांक ०५/०७/२०२६**

पोलीस उप आयुक्त, दक्षिण परिमंडळ -२, मुंबई
मलबार हिल पोलीस ठाणे, मुंबई

**''फिर्यादी यांच्या आईची त्यांच्या राहत्या घरी गळा आवळून खून करुन रु. ९,००,०००/- किंमतीच्या मुद्देमालाची जबरी चोरी केलेबाबतचा गंभीर गुन्हा तांत्रिक विश्लेषणावरुन उघड करुन आरोपीस अटक केलेबाबत''**

फिर्यादी श्रीमती एकता प्रशांत जाधव, वय ३८ वर्ष, रा. ठि. दहिसर प, मुंबई ६८ यांच्या आई मयत ज्योती प्रकाश पवार, वय ५५ वर्षे, रा.ठि. सिमलानगर, मलबार हिल, मुंबई यांची त्यांचे राहते घरात अज्ञात आरोपीने जबरी चोरीच्या उद्देशाने गळा आवळून खून केला व रु. ९,००,०००/- इतक्या किंमतीच्या सोन्या-चांदीचे दागिने, मोबाईल इत्यादीची चोरी केली म्हणून फिर्यादींनी दिलेल्या तक्रारीवरुन मलबार हिल पोलीस ठाणे गु.र.क्र. ३३९/२०२६, कलम १०३(१), ३०९(४) भा.न्या.सं. २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान पोलीस पथकाने तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे गुन्हयातील पाहिजे आरोपीची ओळख पटवली. सदर आरोपी इसमास ताब्यात घेवून त्यास पोलीस ठाणेस आणून त्याचेकडे चौकशी केली असता त्याने त्याचे नाव मोहम्मद कैफ मोहम्मद रफी शेख, वय २३ वर्षे, रा.ठि. सिमलानगर, मलबार हिल मुंबई असे सांगितले. त्याचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास अटक करुन क्लिष्ट गुन्हयाची उकल करण्यात आली.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त, श्री. मनोज शर्मा (कायदा व सुव्यवस्था), मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. शैलेश बलकवडे (दक्षिण प्रादेशिक विभाग), पोलीस उप-आयुक्त, श्रीमती रागसुधा आर. (दक्षिण परिमंडळ -२), सहाय्यक पोलीस आयुक्त, श्रीमती सुमन चव्हाण (गांवदेवी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. भास्कर गोरवे, पोलीस निरीक्षक श्री. दिगंबर बिडवे (गुन्हे), पोलीस निरीक्षक श्री. अब्दूलकादर मलिक (जनसंपर्क), सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रय मोहिते, सहाय्यक पोलीस निरीक्षक रणजीत चव्हाण, पोलीस उप निरीक्षक इंद्रजीत मोहिते, पोलीस उप निरीक्षक विकास बेंडभर, पोलीस उप निरीक्षक रघुनाथ गायकवाड, पोलीस उप निरीक्षक अक्षय चौगूले, पो.ह. लक्ष्मण गुजरे, पो.ह. संजय चव्हाण, पो.ह. भानूदास यादव, पो.ह.नरेंद्र कांबळे, पो.ह. रामेश्वर माचेवाड, पो.ह. सुशांत पवार, पो.शि. आशिष घोरपडे, पो.शि. श्रेयस बोटके, पो.शि. अशोक फडतरे, पो.शि. सुरज कांबळे, पो.शि. विनित सावंत, पो.शि. तन्मय सावंत, पो.शि. जगदेव (तांत्रिक मदत) यांनी सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याकरीता गतिमान कारवाई करुन उत्कृष्ट कामगिरी केली आहे.